४) **पुंजी व धनाला सामान्य रुप देणे :-** मुद्रेमुळे चल आणि अचल संपत्तीला एकच रुप प्राप्त होते. कारण या सर्व संपत्तीचे मुद्रेत सहज परिवर्तन होऊ शकते. मुद्रेच्या उपयोगामुळे सर्व प्रकारचे धन व भांडवल अधिक उपयुक्त झाले आहे.

**निष्कर्ष :-**

पैसा अस्तित्वात येण्यापूर्वी प्रत्यक्ष वस्तुविनिमय पध्दती अवलंबिली जात होती. पैसा वापरात येण्यापूर्वी वस्तू व सेवांच्या मोबदल्यात अन्य वस्तू व सेवा दिल्या किंवा घेतल्या जात असत व त्यामधून प्रत्यक्ष विनिमय होत असे. प्रत्यक्ष विनिमयात गरजा व दुहेरी संयोगाची अडचण. वस्तू व सेवांचे मूल्य मोजण्यात अडचण, मूल्यमापणाच्या प्रमाणभूत साधनाचा अभाव होता. अविभाज्य वस्तूंच्या देवाणघेवाणीमध्ये अडचण टिकाऊ नसलेल्या वस्तूंच्या स्वरुपात मूल्यसंचय करणे अडचणीचे ठरते. कर्जेच्या व्यवहारात अडचणी होत्या. वरील अडचणी दूर करण्यासाठी विनिमय व्यवहारांमध्ये सर्वांना मान्य वस्तू म्हणजे पैसा होय. मुद्रेच्या प्रकारात धातू पैसा, कागदी पैसा, प्रत्ययमुद्रा, प्लॉस्टीक पैसा ही पैशाच्या मुख्य प्रकार आहेत. धातू पैसा चांदी, सोने यासारख्या मौल्यवान धातूचा पैसा म्हणून वापरता येतो. कागदी चलन विशिष्ट प्रकारच्या कागदापासून निर्मित असते. प्रत्यय मुद्रा मध्ये अधिकोष निर्मित प्रत्यय मुद्रांचा उपयोग करण्यात येतो. प्लॉस्टीक पैसा यामध्ये डेबीट कार्ड आणि क्रेडिट कार्ड ही प्लॉस्टीक पासून तयार केलेले कार्ड आहेत.

**संदर्भ सूची :-**


१) मौद्रिक अर्थशास्त्र लेखक :- डॉ.मेधा कानेटकर प्रकाशक:- श्री.साईनाथ प्रकाशन, नागपूर-१० आवृत्ती :- नोव्हेंबर २०१७ पृष्ठ :- २,३

२) मौद्रीक अर्थशास्त्र लेखक :- डॉ.रामदास य. माहोरे प्रकाशक :- साई ज्योती पब्लिकेशन तीन नल चौक, कसारपुरा, इतवारी, नागपूर-४४०००२ प्रथम आवृत्ती :- जुन २०१७ पृष्ठ २

३) मौद्रिक अर्थशास्त्र लेखक :- एस.एम.कोलते प्रकाशक :- पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स महाल, नागपूर-४४००३२ आवृत्ती :- जुलै २०१७ पृष्ठ ७

४) स्थूल अर्थशास्त्र लेखक :- डॉ.मेघा कानेटकर, डॉ.जे.एम.काकडे, प्रा.एस.जी.पाचपोर प्रकाशक :- श्री. साईनाथ प्रकाशन, धरमपेठ, नागपूर-४४००१० आवृत्ती :- २६ जाने. २०१८ पृष्ठ ३९

५) समष्टी अर्थशास्त्र लेखक :-प्रा.ए.बी. साबळे, डॉ.व्ही.एस.भोयर प्रकाशक :- श्री.मंगेश प्रकाशन, नागपूर आवृत्ती :- तृतीय आवृत्ती, जुन १९८५ पृष्ठ ४

६). समष्टी अर्थशास्त्र लेखक :- एच.एल.आहुजा प्रकाशक:- एस.चन्द एण्ड कंपनी लिमि., नवी दिल्ली-११००५५ आवृत्ती :- द्वितीय संस्करण १९८३ पृष्ठ ११०


**18**

# भारतीय जातीय अत्याचार निवारण कायदयातील सामाजिक समतेचा दृष्टीकोन


**सर्जेराव नारायण बोराडे**
पीएचडी स्कॉलर, सोसिओलॉजी डिपार्मेंट,
युनिव्हर्सिटी ऑफ मुंबई


************

➤ **प्रास्तवना:** आज अनुसूचित जाती/जमातीच्या संरक्षण कायदा आणि आरक्षण तरतुदी विरुद्ध अनेक प्रश्न उपस्थित केले जातात. ॲट्रॉसिटी ॲक्ट मध्ये सुधारणा करावी किंवा रद्दबादल करावा अशीही चर्चा केली जात आहे. संप, मोर्चे, आंदोलने आणि लिखाने करून विरोध करण्याचा प्रयत्न होत आहे परंतु वास्तवामध्ये हा कायदा कोणत्या दृष्टिकोनातून निर्माण झालेला आहे? याचा अर्थ आणि उद्देश समजणे महत्त्वाचे आहे. कारण वर्षानुवर्ष जातीय अत्याचाराला सहन करीत आलेल्या दलित आणि आदिवासी समाजाच संरक्षण करून सामाजिक समतेच्या दृष्टिकोनातून हा कायदा निर्माण केलेला आहे. कारण भारतीय समाजव्यवस्था ही मुळत: वर्णव्यवस्था आणि जातीव्यवस्थांवर आधारित चालत आलेली आहे. वैदिक काळात वर्णव्यवस्थेचे प्रभुत्व होते. यातूनच पुढे भारतीय समाज एकसंघ न राहता चार वर्णाच्या हजारो जाती विभाजित झाला आहे. जगात कोणत्याही देशात अशा पद्धतीच्या जातीव्यवस्था आढळून येत नाही. जातिव्यवस्थेमधून अनेक उच्च नीच्चतेचे नियम पाळले जातात. या नियमामधून अस्पृश्य जाती एक वेगळीच ओळख अस्तित्वात आली. शुद्रांमध्ये "अतिशुद्रांच" जाती घटक हे शूद्र जातीची पासूनही वेगळे ओळखले जात होते. त्यांना ''अस्पृश्य'' मानुन कोणत्याही व्यक्तीशी स्पर्श करणे वाईट मानले होते. जातिव्यवस्था विषमतेवर



Scanned by CamScanner

आधारित होती. शुद्र जातीना सर्वात खालचा दर्जा हातो. यामुळे शुद्रजातीना अस्पृश्य जातीचा दर्जा दिला गेल्यामुळे अस्पश्शयांना अतिशय हिन दर्जा व वागणुक दिली जात होती.

अलीकडच्या काळामध्ये शुद्रजातीना "दलित" नावाने ओळखले जाऊ लागले स्वातंत्र्यपूर्व कालखंडात या दलित जातीच्या लोकांचे जीवन परावलंबी स्वरूपाचे होते. त्यांची सामाजिक आणि आर्थिक जीवन हे चाकोरीबद्ध होते. कारण जातीव्यवस्था अतिशय मजबूत व रुढी, परंपरेने बंदिस्त केलेली होती. प्रत्येक व्यक्तीला हे नियम पाळणे बंधनकारक होते म्हणुन परिस्थितीच्या स्वरूपात समाजाने स्वीकारले होते. हे अलिखित नियम असले तरीही दलित जातीच्या प्रगतीला बाधक होते. स्वातंत्र्यानंतर दलितांना 'अनुसूचित जाती' हे संबोधन घटनात्मक दृष्ट्या कलम ३४१ नुसार दिले गेले. अशा या अनुसूचित जातीचे लोक भारतातील प्रत्येक खेड्यात आणि शहरात प्रामुख्याने आढळतात. अनुसूचित जातींच्या लोकांचे मानवी अस्तित्व नाकारले होते. समाजात सामाजिक दर्जा नव्हता, प्रतिष्ठा नव्हती, मानसन्मान तर दूरचीच गोष्ट होती. दलित शतकानुशतके हिंदू जातीव्यवस्थेचे बळी ठरले आहेत. त्यांच्या विरूध्द बलात्कार आणि हत्येसह विविध प्रकारचे जातीवादी भेदभाव आणि पाशवी हिंसाचार केला जात आहेत. संविधानाच्या कलम १७ नुसार, पारंपारिक जातीव्यवस्थेचे मधून उत्पन्न झालेली ''अस्पृश्यता नष्ट'' करण्यात आली आहे. म्हणून अस्पृश्यतेच्या आधारे अस्पृश्य व्यक्तीवर कोणत्याही अपात्रता लादता येणार नाहीत. जर कोणीही असे कृत्य केल्यास तो शिक्षेस पात्र गुन्हा असेल. अशा अनुसूचित जातीच्या जीवनातील जातीय अत्याचार निवारण कायदया विषयी सविस्तर चर्चा करण्याचा हा विषय आहे.

➢ संदर्भ साहित्यांचा आढावा: महंत महाबिर दास, (१९७६), "अ नॅशनल पेनिटेन्स–रिमूव्हल ऑफ अनटचबीलीटी" या विषयावरच्या लेखामध्ये उत्तर भारतातील अनुसूचित जातीतील लोकांच्या विविध समस्यांवर चर्चा केली आहे. त्यांचे संरक्षण करण्यासाठी घटनात्मक आणि कायदेशीर तरतुदी व त्यांना केंद्र व राज्य सरकारांनी वाढवून दिलेल्या कल्याणकारी उपायांचे स्पष्टीकरणही त्यांनी दिले. काय आवश्यक आहे, त्याच्या दृष्टीकोनात बदल आहे. श्रीराम निकम, (१९९२), यांनी आपल्या "डेस्टिनी ऑफ अटॅच्युबल्स इन इंडिया" या पुस्तकात अस्पृश्यता आणि त्यासंदर्भातील प्रसार याबद्दल सांगितले आहे. त्यांनी जातीव्यवस्था आणि अस्पृश्यता यांच्यातील संबंध स्पष्ट केले आणि डॉ. अंबेडकरांच्या दृष्टिकोनातून अस्पृश्यचे मूळ शोधण्याचा प्रयत्न केला. डॉ. अंबेडकर यांनी मांडलेल्या युक्तिवादाचे तो पूर्ण समर्थन करतो की अस्पृश्यांनी शहरांकडे स्थलांतरित होणे आवश्यक आहे. सुखादेव थोरात, (२००२), "ऑपरेशन ऑन्ड डिनाईल दलित डिस्क्रिनेशन ऑफ १९९० सेंचुरी" या विषयावरील लेखात थोरात यांनी दलितांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी भारतातील घटनात्मक तरतुदींच्या अधिनियमांची आभ्यास केला आहे. १९५५ पासून दुय्यम स्रोतांमधून बाजूला झालेल्या दलितांविरूद्ध झालेल्या मानवाधिकारांचे उल्लंघन कर्नाटक, आंध्र प्रदेश, ओरिसा आणि गुजरात या चार राज्यांत स्वतंत्रपणे १९८१ ते १९९७ दरम्यान अनुसूचित जातींवरील गुन्हे आणि अत्याचाराचे विश्लेषण केले. कारण अजूनही अनेक गावे रूढीद्वारे नियंत्रित आहेत आणि पारंपारिक जीवन शैली जगत आहेत. दीपंकर गुप्ता (२०००), "इनट्रेगेटींग कास्टः अंडरस्टॉन्डींग हॅरिची ऑन्ड डिफ्रन्सी इन इंडियन सोसायटी'' यात कामगार आणि जमीनदार यांच्यातील शेती संबंध हा भारतभर कृषी तणावाचा मुद्दा आहे. बिश्रामूरमधील जातीय अत्याचाराचे मुख्य कारण म्हणजे पिकशेतीच्या जागेवर शेती करणार्यांच्या हक्क आणि कुर्मी मध्यमवर्गीय गट हे मुख्य हल्लेखोर होते. कुर्मीनी उच्च–जातीच्या भूप्रदेशांत केवळ अनुसूचित जाती लोकांवरच नव्हे तर यादव गटकांवर ही आक्रमण केले. अनुसूचित जाती आणि यादव त्यांच्यात समानता आहेत आणि पारंपारिकपणे समान श्रेणीचे मानले जातात. बेला भाटिया, (१९९७), यांनी "अन्टॉमी ऑफ मस्साक्रो" या विषयावरील बिहारमधील बाथानी टोला येथे झालेल्या हत्याकांडाचे चर्चा केली. मध्य बिहारात जातींवादी हिंसक चकमकींचे स्थान मानले जाते. दलितांना नेहमीच अनैतिक त्रास सहन करावा लागत होता. मध्य बिहारात खून, गावातुन हाकलणे, घरे जाळणे आणि स्त्रीपुरुषांवरही शारीरिक



Scanned by CamScanner

अत्याचार करणे अशा घटना मध्यबिहारच्या इतिहासात सामान्य बाब होती. बाथानी टोला हत्याकांड १९९६ मध्ये दलित महिला आणि मुलांचा नरसंहार करण्यात आला होते. या हत्याकांडाची सर्व माहिती आणि ज्या सामाजिक आर्थिक पार्श्वभूमीवर हा हत्याकांड घडल होते त्याचे तपशील स्पष्टपणे मांडले आहेत. अशा हिंसक घटनांना सामोरे जाण्यासाठी सार्वजनिक प्रशासनातील हलगर्जीपणा, ज्याने एकरुपतेची शंका निर्माण होते, गरीबांना सन्मानापासून कसे वंचित ठेवले जाते ? आणि मरेपर्यंत जाती आणि वर्ग कसे त्यांचा छळ करतात? बाथानी टोला हा ''भयंकर हत्याकांड" असल्याचा दावा आहे. बिहारमध्ये जाती आणि वर्गाची युद्धे ही एक सामान्य गोष्ट आहे. बिहारमधील त्या जातीय युद्धांनी कृषी संघर्षाला नवे वळण दिले ज्यामुळे कुठील राजकीय डाव खेळले जात आहेत. ऑब्रीज पिंट, (१९९२), "कास्ट कॉन्फलिक्ट इन कर्नाटका" या लेखात कर्नाटकातील इदापानूर गावात दलित आणि उच्चवर्णीयांनी यांच्यात झालेल्या विवादास्पद संघर्षाबद्दल चर्चा करतात. सर्वसाधारण प्रवर्गातुन दलित उमेदवाराच्या निवडीमुळे उच्चवर्णीयांकडून दलितांचा छळ झाला होता. दलितांना उच्चवर्णीयांकडून ठार मारण्याची आणि त्यांची संपत्ती नष्ट करण्याची धमकी देऊन घेराव घातला होता. परिस्थिती इतकी तणावपूर्ण बनली तेंव्हा पोलिसांनी गोळीबार केला त्यामध्ये आठ जणांचा मश्त्यू झाला होता.[७] गोपाळ गुरू (१९९५) "गोवारी ट्रॅजेडी: क्रायसीस ऑफ मराठा हेगेमनी", या लेखात २३ नोव्हेंबर १९९४ रोजी झालेल्या हिंसाचाराच्या गंभीर घटनेबद्दल आणि अकोला जिल्ह्यातील गायरान जमीन संबंधी हिंसाचार घटनांत महाराष्ट्रातील सत्ताधारी कॉंग्रेस पक्षातील मराठा वर्चस्वाचा गोवारी शोकांतिकेवर प्रकाश टाकला होता. अकोला जिल्ह्यातील दलितांचे गायरान जमीनीतील उभी पिके नष्ट करण्याच्या घटनातील आरोपिंना निर्दोषतेबद्दल. तसेच दलितांना गायरान जमीनतून हाकलून दिले होत त्यांना पुन्हा जमीन देण्याच्या विरोध केला जात होता. दुसरीकडे सुमारे १,०००,०० गोवारीं समाजांनी २३ नोव्हेंबर १९९४ रोजी नागपूर विधानभवनावर निषेध मोर्चा काढला होता. त्यावेळी पोलिसांच्या हस्तक्षेपामुळे चेंगराचेंगरी झाली आणि त्यात ११३ गोवारी, बहुतेक महिला व मुले मरण पावली. सरकारने नियंत्रण ठेवण्यासाठी सक्तीचा अवलंब केला होता यामुळे सदर घटना घडली यावरून दलित आणि आदवासीं संबंधी सरकारी असंवेदनशील भावनेचा प्रत्येय येतो होतो. गोपाळ गुरू (१९९२) "अंडरस्टॉन्डिग वायलेशन अगेन्सट दलितस इन मराठवाडा" यामध्ये मराठवाड्यातील दलितांवरील हिंसाचाराला समजून घेण्यासाठी मराठवाडा विद्यापीठाचे "नामातर" घटनेचा मागोवा घेतला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव मराठवाडा विद्यापीठ देण्याच्या सरकारी निर्णय प्रक्रियेला सवर्ण जातीच्या विरोधामुळे मराठवाड्यात हिंसाचार झाला होता. यात दलितांच्या वस्त्यांवर सामुहिक हल्ले, मारहाण, जाळपोळ, मालमत्तेचे नुकसान केले होते आणि कांही दलितांना आपले जीव पण गमवावे लागले होते. ग्रामिण भागातील उच्चजातींनी दलित समाजावर सामुहिक बहिष्कार टाकुन जीवनावश्यक वस्तू मिळवण्यास आडचण निर्माण केली होती. हा हिंसाचार ब्राह्मणी जातीय भावनेनेच प्रेरित होता.

➢ **संशोधन अभ्यासाचा उद्देश:** भारतीय समाजातील सामाजिक समता प्रस्तापित करण्यासाठी संविधानातील कायद्याचे महत्व पटवून देणे. पारंपारिक जातिव्यवस्थेला सिद्ध देऊन सामाजिक समता, देशाची एकता आणि अखंडतेच्या महत्त्वाचा अभ्यास करणे. सिमांतिक समुदायातील उपेक्षित वर्गाना इतरांच्या बरोबरीने जीवन जगण्याचे मार्ग स्पष्ट करणे. जातीय अत्याचार निर्मूलन करून जातिअंताच्या दिशेने समाजाला घेऊन जाणे.

➢ **संशोधन पद्धती:** सदर अभ्यासामध्ये वस्तुनिष्ठ निरीक्षण पद्धतीने समाजातील जातीभेदाला दूर करण्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या कायद्याचे डॉ. आंबेडकर यांच्या वैचारिक दृष्टिकोनातून अशय विश्लेषण पद्धतीने अभ्यास केला आहे. या अभ्यासासाठी दुय्यम साहित्य स्रोतांचा उपयोग करण्यात आला आहे.

➢ **जातीय अत्याचार निवारण कायदयाचे विश्लेषण:**

अनुसूचित जाती (एससी) म्हणून ओळखले



Scanned by CamScanner

जाणारे दलित शतकानुशतके हिंदू जातीव्यवस्थेचे बळी ठरले आहेत. त्यांच्यावर बलात्कार आणि हत्येसह विविध प्रकारचे जाती भेदभाव आणि पाशवी हिंसाचार केला जात आहेत. ब्रिटिश भारतात, १८५० च्या जाती विकलांगता संपवण्यासाठी अधिनिय XXI (Caste Disabilities Removal Act XXI) कायद्या अंतर्गत जातीभेद आणि अस्पृश्यते विरूद्ध कायदेशीर बंदी घालण्यात आली होती. त्यानंतर भारत सरकार अधिनियम १९३५ मध्ये अनुसूचित जातींना विशेष संरक्षण देण्यात आले. १९४३ ते १९५० दरम्यान जाती आधारित विकलांगता समाप्त करण्यासाठी भारतीय राज्यांनी विविध १७ कायदे केले होते. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारतीय स्वातंत्र्याचा सूर्योदय झाला. भारताने लोककल्याणकारी, समाजवादी, लोकशाही प्रणालीचा स्वीकार केला. यामुळे देशातील प्रत्येक नागरिकांना स्वातंत्र्याकडून अनेक अपेक्षा निर्माण झाल्या. अनेक वर्षाच्या गुलामी पासून मुक्ती मिळाली आहे. त्याकाळातील राज्यकर्त्यांनी नागरिकांच्या हक्क व कर्तव्य करीता व्यापक व लिखित स्वरूपाचे 'भारतीय संविधान' निर्माण करून २६ जानेवारी १९५० पासून अंमलात आणले आहे. देशातील प्रत्येक नागरिकांना समता, न्याय व सन्मान देण्याचे बहुमूल्य योगदान केले.

भारतीय राज्यघटनेच्या कलम १५ प्रमाणे, देशातील नागरिकांमध्ये धर्म, जात, वंश, लिंग, भाषा आणि जन्म ठिकाण या आधारे भेदभाव केला जाणार नाही. अशा आधारावरून कोणत्याही व्यक्तीस दुकाने, उपाहारगृहे, भोजनालय, सार्वजनिक मनोरंजन केंद्रे वगैरे ठिकाणांमध्ये प्रवेश नाकारता येणार नाही. सरकारच्या मदतीने निर्माण केलेल्या विहिरी, घाट, रस्ते किंवा इतर सार्वजनिक ठिकाणी वावरणे किंवा उपयोग करण्यासाठी कोणताही निर्बंध किंवा अटी शर्ती घालता येणार नाहीत. संविधानाच्या कलम १६ नुसार, सरकारी नोकऱ्यांमध्ये सर्वांना समान संधी देण्यात आलेली आहे. या कलमातील तरतुदीनुसार कोणत्याही नागरिकांना धर्म, जात, वंश, लिंग, भाषा आणि जन्म ठिकाण याच्या आधारे देशात नोकरीसाठी अपात्र ठरवण्यात येणार नाही. तसेच भेदभाव करता येणार नाही. संविधानाच्या कलम १७ नुसार, पारंपारिक जातीव्यवस्थेचे मधून उत्पन्न झालेली "अस्पृश्यता" नष्ट करण्यात आली आहे. म्हणून अस्पृश्यतेच्या आधारे अस्पृश्य व्यक्तीवर कोणत्याही अपात्रता लादता येणार नाहीत. जर कोणीही असे कृत्य केल्यास तो शिक्षेस पात्र गुन्हा असेल. राज्यघटनेच्या कलम १९ नुसार, सरकारच्या अनुदानावर सरकारद्वारे मदत करणारी कोणतीही शैक्षणिक संस्थेने कोणत्याही नागरिकांमध्ये धर्म, जात, वंश, लिंग, भाषा आणि जन्म ठिकाण याच्या आधारावर प्रवेश नाकारता येणार नाही. संविधानाच्या कलम ३८ नुसार, राज्य अशाच समाजव्यवस्था निर्माण करेल की, ज्यामुळे अस्पृश्यसह इतर सर्वांना समान सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय मिळू शकेल. संविधानाच्या कलम ४६ नुसार, समाजातील दुर्बल घटक, अनुसूचित जातीजमातीना सरकारकडून आर्थिक व शैक्षणिक घटकासंबंधित सोयी–सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. तसेच त्यांना संरक्षण दिले जाईल. ज्यामुळे आपला सर्वांगीण विकास करून घेऊ शकतील. संविधानाच्या कलम १६४ नुसार, अनुसूचित जातीजमातीच्या कल्याणाचे व हिताचे संरक्षण करण्यासाठी राज्याने सल्लागार मंडळ व स्वतंत्र विभागाची स्थापना व व्यवस्था करेल. संविधानाच्या कलम ३३० आणि ३३२ नुसार अनुसूचित जाती व जमातीच्या लोकांसाठी लोकसभा व विधानसभेत पुरेसे प्रतिनिधित्व मिळावे म्हणून त्यांना दहा वर्षासाठी आरक्षणाची तरतूद करण्यात आलेली आहे. मुदत संपल्यानंतर प्रत्येक तात्कालिन केंद्र सरकारने दहा–दहा वर्षाची मुदतवाढ केलेली आहे. म्हणून आजही राजकीय आरक्षण लागू आहे. संविधानाच्या कलम ३३५ नुसार केंद्र आणि राज्य सरकारच्या नोकऱ्यात अनुसूचित जाती जमातीच्या उमेदवारांसाठी प्रशासनाची कार्यक्षमता कायम राखून विशेष सवलती देण्यात आल्या आहेत. अशा उमेदवारांना प्रशासकीय जागेसाठी लागणारी शैक्षणिक व इतर पात्रता पूर्ण करणे आवश्यक आहे. पण वय मर्यादेत थोडी सूट देण्यात येते. संविधानाच्या कलम ३३८ नुसार अनुसूचित जाती–जमातीच्या एक राष्ट्रीय आयोगाची तरतूद करण्यात आली आहे. अनुसूचित जाती जमातीच्या कल्याणासाठी संविधानाने दिलेल्या घटनात्मक संरक्षणाच्या तरतुदीचे पालन होते किंवा



Scanned by CamScanner

नाही. हे पाहणीचा अहवाल देशाच्या राष्ट्रपती सादर करण्याची जबाबदारी सदर आयोगाची असते.

**१. नागरी हक्क संरक्षण कायदा १९५५** (अधिनियम क्रमांक २२): भारतीय संविधानानुसार अस्पृश्यते विषयी जाहीर शिकवण देणे व पालन यातून उद्भवणारी कोणतीही अपात्रता लादल्याबद्दल आणि त्याच्याशी निगडित असलेल्या बाबती बद्दल शिक्षा विहित करण्यासाठी भारतीय गणराज्याच्या सहाव्या वर्षी संसदेकडून सदर अधिनियम पारित करून संपूर्ण भारतभर राज्यपत्रानुसार अधिनियम केला आहे. एखाद्या व्यक्तीला कोणत्याही अपात्रता ठरवून हॉटेल, भोजनालय, घर/इमारत व करमणुकीचे केंद्र सार्वजनिक प्रार्थनास्थळे वगैरे ठिकाणी वावर किंवा उपभोगास अडथळा करणे. धार्मिक नि:समर्थता लादणे. म्हणजे सार्वजनिक प्रार्थनास्थळी प्रवेश नाकारणे, पवित्र तलाव, विहिरी, झरे, नद्या, सरोवर यावर स्नान कारणे किंवा पाण्याचा उपभोग करण्यास अडथळा करणे. सामाजिक नि:समर्थता दुकान, उपाहारगश्हे, हॉटेल, करमणूक केंद्रे, धर्मशाळा, व्यावसायिक वगैरे बद्दल अडथळा निर्माण करणे. रुग्णालय/दवाखाने यामध्ये प्रवेश नाकारणे. वस्तू विक्री करणे, सेवा देण्यास नकार देणे, अस्पृश्यते वरून एखाद्याची छेड काढणे, एखाद्याला हिणवणे किंवा अपमाणित करणे, सक्तीचे श्रम करण्यास भाग पाडणे वगैरे सारख्या अस्पृश्यते वरून करण्यात येणाऱ्या गुन्ह्याबद्दल शिक्षेची तरतूद केली आहे. कारण अनुसूचित जाती–जमातीच्या व्यक्तींना अस्पृश्यते वरून जाणिवपूर्वक हीन दर्जाची वागणूक दिली जाणार नाही. सर्वांना सन्मानपूर्वक जीवन जगता यावे यासाठी त्यांच्या अधिकाराचे संरक्षण देण्यासाठी भारतीय संसदेने 'अस्पृश्यता निवारण अधिनियम–१९५५' हा कायदा संमत केला. सदर कायद्यात दुरुस्ती करून 'नागरी संरक्षण हक्क संरक्षण कायदा १९५५' असे नाव देण्यात आले.

२. **अनुसूचित जाती आणि जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा १९८९** अधिनियम क्रमांक ३३: भारतीय गणराज्याच्या ४० व्या वर्षी संसदेने संमत केला. भारताच्या राष्ट्रपतींनी ११ सप्टेंबर १९८९ रोजी सहमती दिली आणि १२ सप्टेंबर १९८९ अनुक्रमांक ३९ वर प्रसिद्ध केला. सदर कायद्याची अंमलबजावणी दिनांक ३१ जानेवारी १९९० पासून सुरू झाली आहे. कायद्यानुसार अनुसूचित जाती/जमातीच्या व्यक्तीपैकी नसलेल्या कोणत्याही व्यक्ती अनुसूचित जाती/जमातीच्या व्यक्ती विरुद्ध अत्याचार करते. त्यांना सहा महिने ते पाच वर्षापर्यंतची शिक्षा आणि न्यायालय निर्धारित आर्थिक दंड ठेवण्यात येतो. अनुसूचित जाती/जमातीच्या व्यक्तीला खाण्या योग्य नसणारे पदार्थ खाण्यास किंवा पिण्यास जबरदस्ती करणे, इजा करणे, अपमान करणे, त्रास देणे, नग्न धिंड काढणे, मानवी प्रतिष्ठेचा अवमान करणे, लज्जास्पद कृत्य करणे, जमीन भोगवटा संबंधी जबरदस्ती जमीन बळकावणे, जमीन व पाणी वापरात अडथळा करणे, भीक मागण्यास भाग पडणे, वेटबिगारी काम करण्यास भाग पाडणे, विशिष्ट उमेदवारास मतदान करण्यासाठी धाकदडप दाखवणे. खोट्या दावा किंवा फौजदारी कार्यवाही करणे, लोकसेवकास खोटी माहिती देऊन कायदेशीर अधिकाराचा वापर करून त्रास देणे, सार्वजनिक ठिकाणी जाणीवपूर्वक अपमान करणे किंवा धाक दाखवणे, अनुसूचित जातीच्या स्त्रियांचा विनयभंग करणे, अतिप्रसंग करणे, व प्रतिष्ठित करणे, शीलभंग करणे, हिंसक हल्ले करणे, लैंगिक छळ करणे, अपहरण करणे, पिण्याचे पाणी दूषित करणे, सार्वजनिक ठिकाणी जाण्यायेण्यास रूढीनुसार प्रतिबंध करणे, घर गाव किंवा अन्य निवास ठिकाणे सोडण्यास भाग पाडणे, अनुसूचित जाती/जमातीच्या व्यक्तीच्या विरुद्ध खोटी साक्ष पुरावे देणे, घर, प्रार्थनास्थळे व मालमत्तेच्या नुकसानसाठी आग लावणे, पुरावे नष्ट करणे, लोकप्रतिनिधीनी अनुसूचित जाती/जमातीच्यासंबंधी कर्तव्यात कसुर करणे, आपराध करण्याची शक्यता असणाऱ्या व्यक्तीस हद्दपार करणे, अनुसूचित जाती/जमातीच्या खटल्यासाठी विशेष न्यायालयाची स्थापना करणे, सरकारी वकील नियुक्त करणे, जिल्हा अधिकारी आणि उपविभागीय दंडाधिकारी किंवा कार्यकारी दंडाधिकारी किंवा पोलीस उपअधीक्षक अपेक्षा कमी दर्जा नसलेल्या कोणत्याही पोलीसाधिकार्यांकस माहिती मिळाल्यानंतर योग्य ती चौकशी करून अत्याचार प्रवण क्षेत्र घोषित करून त्या ठिकाणी शांतता व कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी



Scanned by CamScanner

योग्य तो प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे. फौजदारी संहिता कलम ४३८ लागू करणे या अधिनियमात भारतीय दंड संहिता कलम ३६० लागू होत नाही. सदर कायदा प्रभावी आहे. याची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी शासनाची आहे. परंतु सदर कायद्याअंतर्गत सदभावाने केंद्र शासन, राज्य शासन, शासकीय अधिकारी वगैरे विरुद्ध दावा किंवा कार्यवाही करता येणार नाही. कारण एवढ्य तरतुदी असूनही सदर कायद्यामध्ये काही उणिवा आहेत म्हणून या कायद्यामध्ये सुधारणा करणारे नवीन दुरुस्ती विधेयक मांडण्यात आले आहेत

३. **अनुसूचित जाती आणि जमाती अत्याचार प्रतिबंधक नियम १९९५** (अधिनियम १९९५): सदर नियमानुसार अनुसूचित जाती आणि जमाती विरुद्ध अत्याचाराची व्याख्याही अनुसूचित जाती आणि जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा १९८९ अधिनियम क्रमांक ३३ प्रमाणेच असेल. अवलंबित ही संज्ञा अत्याचारात बळी ठरलेल्या व्यक्तीची मुले, पत्नी, आई—वडील, विधवा बहीण, पूर्वीच मरण पावलेल्या मुलांची विधवा पत्नी, तिची मुले यांचा समावेश होतो. निर्धारण क्षेत्र म्हणजे ज्या क्षेत्रात जातीय अत्याचार घडू शकतो असे राज्य सरकारला वाटले किंवा असे क्षेत्र तेथे पुन्हा पुन्हा जातीय अत्याचाराच्या घटना घडण्याची भीती असते अशा घटनांसाठी संवेदनशील असते. ऐच्छिक संघटन (एनजीओ) म्हणजे अनुसूचित जाती आणि जमाती यांच्या संबंधातील कल्याणकारी कार्यक्रमात सहभागी असलेली संस्थाची नोंदणी अधिनियम क्रमांक १८६० च्या २१ कलमानुसार झालेली संस्था होय. बाकी नियम १९५५ व १९८९ कायद्या प्रमाणे प्रतिबंधात्मक उपाय म्हणुन अनुसूचित जाती आणि जमाती यांच्या विरुद्ध होणाऱ्या अत्याचार प्रतिबंध करणे. राज्य शासनाने असे क्षेत्र जेथे पुन्हा पुन्हा जातीय अत्याचारच्या घटना घडण्याची भीती असते आणि अशा घटनांसाठी संवेदनशील असते यांची घोषित करावे. जिल्हाधिकारी किंवा उपविभागीय दंडाधिकारी किंवा कार्यकारी दंडाधिकारी पेक्षा कमी नसलेल्या कोणत्याही पोलिस अधिकाऱ्यास माहिती मिळाल्यानंतर 'निर्धारणक्षेत्रा'ला भेट देऊन योग्यती चौकशी करून सदर ठिकाणी शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी दक्षता समितीची स्थापना करावी. 'जागृतीकेंद्राची' उभारणी करावी. सदर घटनेची नोंद पोलीस ठाण्यातील पुस्तिकेत करावी, माहितीची एक प्रत ताबडतोब फिर्यादाराला मोफत देण्यात यावी, सदर गुन्ह्याची नोंद करण्यास टाळाटाळ करण्याची लेखी स्वरूपात वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार करू शकतो, चौकशी करून योग्य ती कार्यवाही करावी, उच्च अधिकार यांनी घटनास्थळाला भेट देऊन चौकशी करावी त्याचा अहवाल राज्य शासनाला पाठवला जावा, अत्याचारग्रस्त व्यक्ती व त्याच्या कुटुंबातील पात्र व्यक्तींची यादी करणे, अत्याचारग्रस्त व्यक्तीच्या मालमत्त नुकसानाचा अहवाल तयार करणे, अत्याचारग्रस्त व्यक्ती व्यक्तीच्या साक्षीदारांना संरक्षण देणे, उच्च दर्जाच्या पोलीस अधिकाऱ्यांमार्फत तपास केला जाईल, सदर तपास ३० दिवसाच्या आत पूर्ण करणे, अनुसूचित जाती आणि जमातीच्या संरक्षणाकरिता उपशाखा रचना करणे, अनुसूचित जाती आणि जमातीच्या एखाद्या व्यक्तीने अधिकारी म्हणून नियुक्त करावी, अत्याचारग्रस्त क्षेत्रासाठी विशेष समिती समन्वय साधण्यासाठी अनुसूचित जाती आणि जमाती यांच्या उच्च दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करावी, अत्याचाराला बळी ठरलेल्या व्यक्तीचे अवलंबित नातेवाईक आणि साक्षीदार यांना प्रवास भत्ता व दैनिक भत्ता निर्वाह भत्ता आणि परिवहन सुविधा देणे, जिल्हा प्रशासनाने अत्याचार ग्रस्त ठिकाणी झालेल्या जीवित व मालमत्तेचे नुकसान निर्धारित करणे अत्याचार ग्रस्त व्यक्ती आणि अवलंबित व्यक्तींची यादी करण्यासाठी जिल्हा अधिकारी व पोलिस अधीक्षक यांनी भेट देणे, गुन्ह्याची नोंद नुसार आरोपींना पकडण्यासाठी प्रभावी उपाय करणे, सक्षम तपास अधिकारी नियुक्त करून पोलीस दल तैनात करणे, अत्याचारग्रस्त त्यांना योग्य ती मदत लवकर पुरवठा करणे, नुकसान भरपाई योग्य हक्कदारास पोहोचवणे, अत्याचार ग्रस्तांना योग्य पुनर्वसन करणे, अत्याचारात संबंधीनी काम करण्यासाठी योग्य अधिकारी व इतर कर्मचारी निवड करणे, सदर कायद्याअंतर्गत नोंदलेल्या गुन्ह्यांचा तपास व इतर माहिती आढावा अहवाल राज्य शासनाला वर्षातून किमान दोन वेळा सादर करणे, राज्य शासनाच्या प्रासंगिक योजना, विविध अधिकाऱ्यांच्या



Scanned by CamScanner

भूमिका व जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्था आणि ऐच्छिक संघटना सर्वात समन्वय निर्माण करून काही जीवनाक आवश्यक बाबींचा उपयोग केला जातो. रोख आर्थिक रक्कमेचा त्वरित पुरवठा करणे, पुनर्वसन योजना करणे, अवलंबित व्यक्तीला सरकारी नोकरी देणे, अवलंबिता वृद्ध व्यक्तींना निवृत्तीवेतन देणे, अनिवार्य नुकसान भरपाई देणे, सामाजिक आर्थिक स्थिती सुधारणे योजना पक्की घरे पुरवठा करणे, सक्षम उच्चपदस्थ अधिकाऱ्यांमार्फत तयार केलेल्या अहवालाची एक प्रत राज्य शासनाने केंद्र सरकारला पाठवावी, राज्य पातळीवर २५ सदस्यांची दक्षता आणि समन्वय समितीची स्थापना करावी मुख्यमंत्री/राज्यपाल अध्यक्ष असतील, गृहमंत्री, अर्थमंत्री, सामाजिकन्यायमंत्री, अनुसूचित जाती जमातीचे संसद सदस्य, विधानसभा सदस्य, मुख्य राज्य सचिव, गृहसचिव, पोलीस महासंचालक, अनुसुचित जाती आणि जमातीचे संसद सदस्य, विधानसभा सदस्य, मुख्य राज्य सचिव, गृहसचिव, पोलीस महासंचालक, अनुसूचित जातीजमाती राष्ट्रीय आयोगाचे प्रतिनिधी, केंद्र शासनाकडून तीन अशासकीय सदस्य, सामाजिकन्याय विभागाचे सचिव निमंत्रक असतो. अशी जिल्हा पातळीवर पण दक्षता व समन्वय समिती असते जिल्हाधिकारी हा समितीचा प्रमुख असतो. जिल्हा पालकमंत्री संसद व विधानसभेचे सदस्य, अनुसूचित जाती–जमाती प्रथमवर्ग अधिकारी, अनुसूचित जातीजमातीचे व अशासकीय पाच सदस्य आणि अन्य समाजातील तीन सदस्य जिल्हा सामाजिकन्याय विभाग अधिकारी हे पदसिद्ध सचिव असतात. केंद्र सरकार आणि राज्य सरकार निर्देशित कामे केली जातात. राज्य शासन संबंधीत प्रकरणाचा अहवाल ३१ मार्चपूर्वी केंद्र सरकारकडे सादर करणे, पण विविध तरतुदी युक्त कायदा करूनही जातीवादाची समस्या समाजातून हद्दपार करण्याची घटनात्मक अधिनियम तयार केलेला आहे.

४. **अनुसूचित जाती आणि जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा (संशोधन नियमावली) २०१६** (भारताचे राजपत्र असाधारण क्रमांक २६८): दिनांक १४ एप्रिल २०१६ च्या अधिसूचनेनुसार या नियमावलीचे नाव अनुसूचित जाती आणि जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा नियम १९८९ संशोधन नियमावली आहे भारत सरकारच्या राजपत्रात द्वारे प्रसिद्ध करून अंमलबजावणी प्रारंभ झाली आहे या अधिनियमाची व्याख्या संशोधनाच्या विविध घटनात्मक दुरुस्ती करून अनेक कायदे केले. अनुसूचित जाती/जमातीच्या व्यक्तीस मानवी विष्ठा किंवा घाण, किळसवाणा पदार्थ खाण्यास किंवा पिण्यास भाग पाडणे. अत्याचारग्रस्त व्यक्तीस इजा पोहोचविणे, अपमान करणे, त्रास देण्यासाठी घर किंवा जागेत किंवा जागे शेजारी मानवी विष्ठा, केरकचरा, जनावरांची मढी टाकणे. अत्याचारग्रस्त व्यक्तीच्या अंगावरील कपडे काढणे, नग्न करणे, रंग फासणे, चेहरा विद्रूप करून धिंड काढणे. अनुसूचित जातीजमातीच्या जमिनीवर अन्यायाने विल्हेवाट केल्यास, जमीन किंवा घर स्वतःच्या नावे हस्तांतरित करून घेणे. अत्याचारग्रस्तच्या जमीन किंवा घर किंवा जागेतून हुसकावून लावणे. जमीन, जागा, पाणी देण्याच्या हक्कापासून वंचित करणे. अत्याचारग्रस्ताकडून जबरदस्तीने वेठबिगार कामे करून घेणे. इच्छेविरुद्ध दुसऱ्यास मतदान करण्यास भाग पाडणे. जाणीवपूर्वक अपमान करण्याच्या हेतूने लोकान समक्ष अपमानकारक बोलून, पान उतारा करणे. भारतीय दंड संहिता ३५४, ३५४क, ३५४ख खालील अत्याचारग्रस्त जाती/जमातीच्या स्त्रीयांचे शीलभंग, विनयभंग करणे. अनुसूचित जातीजमातीच्या लोकांना पाणी वापराच्या जलाशयात विहिरीत घाण टाकून दूषित करणे. शाळा, महाविद्यालय, दवाखाना, घाट सार्वजनिक रस्ते किंवा अन्य सार्वजनिक ठिकाणी प्रवेश नाकारणे, येण्याजाण्याचा प्रतिबंधक कारणे. अनुसूचित जातीजमातीच्या व्यक्तीस घर व गाव सोडण्यास भाग पाडणे. अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम अत्याचार करणाऱ्या वर गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ करणे,तपासात हायगैय करणाऱ्या अधिकाऱ्यावर निष्काळजी पणा सबंधी कार्यवाही होऊ शकते.

➤ **निष्कर्ष:** अनुसुचित जातीच्या ऐतिहासिक जीवनाचा आढव्या नंतर लक्षात येते की वैदिका काळातील वर्णव्यवस्था लवचिक होती तर उत्तर वैदिक काळातील म्हणजे मनुस्मृती काळातील वर्णव्यवस्थेने ताठर स्वरूप धारण केले होते. त्याचा दुष्परिणाम म्हणुन जातीसंस्थेने



Scanned by CamScanner

अस्पृश्यता सारखी अमानवी आणि क्रुर प्रथा समाजत रूढ झाली. स्पृश्य आणि अस्पृश्य ही कल्पना धार्मिक पवित्र अपवित्रते बरोबर जोडली गेली त्यातुन उच्चवर्णीयांनी कनिष्ठवर्णीयांवर अमानवी बंधने लादली. ही संकल्पना जातीसंस्थेने पण कायम करून "अस्पृश्यजाती" ही संकल्पना जन्माला घातली. या दृष्टप्रथेने भारतीय समाजव्यवस्थला कलंकीत केले आहे. संविधानाच्या कलम १५ नुसार देशातील कोणत्याही नागरिकांना जात, धर्म, वंश, पंथ, लिंग, प्रदेश, भाषा वगैरेच्या आधारे भेदभाव करता येणार नाहीं. कलम १७ नुसार देशातील अस्पृश्यता नष्ट केली आहे. अनुसूचित जातीच्या लोकांना सर्वान सोबत सन्मानाचे जीवन जगण्यासाठी अनेक कायदे केलेले आहेत त्यापैकी सर्वात महत्त्वाचा कायदा म्हणजे ॲक्ट्रासिटी ॲक्ट किंवा अनुसूचित जाती जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा जो अनुसूचित जाती जमाती म्हणून ओळखले जाणारे दलित आदिवासी शतकानुशतके हिंदू जातीव्यवस्थेचे बळी ठरले आहेत. त्यांच्यावर बलात्कार आणि हत्येसह विविध प्रकारचे वांशिक भेदभाव आणि पाशवी हिंसाचार केले जात आहेत. म्हणून नागरी हक्क संरक्षण कायदा (अस्पृश्यता निवारण) अधिनियम १९५५ राष्ट्रीय कायदा मंजूर करण्यात आला, ज्यामध्ये १९७६ मध्ये त्याच्या तरतुदी अधिक कठोर करण्यासाठी सुधारित करण्यात आल्या आणि नागरी हक्क संरक्षण कायदा १९५५ (पीसीआर कायदा) असे नाव ठेवण्यात आले. अनुसूचित जाती जमाती विरूद्ध जातीभेद आणि अस्पृश्यते निवारण करण्यासाठी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा १९८९ कायदा मंजूर करण्यात आला. हा अत्याचार प्रतिबंधक कायदा जानेवारी १९९० पासून जाती अत्याचार निवारण करण्यासाठी दुसरा कायदा अस्तित्त्वात आला. सर्वोच्च न्यायालयात पुनरावलोकन याचिका दाखल करून सरकारने प्रतिक्रिया दिली आणि त्यानंतर कायद्यात त्याच्या मूळ स्वरूपामध्ये सुधारणा केली. नागरी हक्कांचे रक्षण करण्यासाठी कायदे असूनही एससी—एसटी समुदायातील सदस्यांवरील अत्याचारात कोणतीही कमी झाली नाही, अशी प्रतिक्रिया खुद केंद्र सरकारनेच सर्वोच्च न्यायालयात दिली होती. यामुळे अस्पृश्यता निर्मूलनाच्या संदर्भा काही प्रमाणात कायद्याचा धाक निर्माण झालेला आहे. म्हणून पूर्वीपेक्षा अत्याचाराचे प्रमाणात कमी होत आहे. पण अनुसूचित जातीच्या समाजात आंबेडकरी चळवळ आणि शैक्षणिक जागृती यामुळे अन्याय हा अन्याय असतो म्हणून तो सहन न करता त्याचा प्रतिकार केला पाहिजे या भावनेने स्वीकार केला आहे. पण अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी तलवारीला तलवारीने म्हणजे जातीय अत्याचाराला अत्याचाराने न लढता कायद्याने किंवा विचाराने लढले पाहिजे ही भावना समाजात विकसित झाली आहे. सामाजिक विषमता कमी करण्यासाठी प्रयत्न अनुसूचित जातींच्या लोकांकडून केले जात आहेत. अनुसूचित जाती समुदायावर सामाजिक राजकीय आर्थिक व शैक्षणिक स्तरावर होणारे परिवर्तनामुळे दैनंदिन जीवन शैलीत बदल झालेला आहे. राहणीमानात सुधारणा होत आहे. ही बाब तथाकथित उच्च जातीय समाजाला पचनी पडण्यासारखे नाही. कारण जातीवादी विचाराची मुळे एवढी खोलवर रुजली आहेत की यामुळे जातिवाद्यांना आज जातीय आत्याचाराचे स्वरूप काही प्रमाणात बदलले आहे. म्हणून आज तरी ॲट्रॉसिटी ॲक्टची गरज भारतीय समाजात आहे.

➢ **सारांश:** ब्रिटिश कालखंडात १८५० व १९३५ पासून भारतीय स्वातंत्र्यानंतर १९५५, १९८९, २०१६ आणि अगदी आलीकडे २०१८ पर्यत वेळोवेळी अनुसूचित जाती जमाती आत्याचार प्रतिबंधक कायदात सुधारित आणि कडक करण्याचा प्रयत्न केंद्र शासनाने केलेला आहे. अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम (सुधार अधिनियम २०१८): सोमवारी २० मार्च २०१८ च्या सुप्रीम कोर्टाने विवादास्पद निर्णयाने अनुसूचित जाती/जमाती संरक्षण कायद्यातील कठोर तरतुदी कमी करण्याचा निकाल दिली. सर्वोच्च न्यायालयाने निकालामध्ये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) १९८९, कायद्यातील तरतुदी कांही सौम्य केल्या होत्या. लोकसेवकांवर या कायद्यानुसार तक्रार दाखल झाल्यानंतर त्वरित अटक करता येणार नाही असे म्हटले होते. या निकालाने हा कायदा निष्पाप व्यक्तीविरूद्ध खोटी



Scanned by CamScanner

फौजदारी तक्रारी दाखल करण्यासाठी वापरण्यात येत असल्याचे सांगून मूळ कायदा सौम्य करण्याचा प्रयत्न केला होता. निकालानुसार सर्व अनुसूचित जाती/जमाती समुदायातील सदस्यांना 'लबाड किंवा खोडकर' समजणे चुकीचे होते. त्यांच्या 'मूलभूत मानसन्मान' च्या विरोधात होते. संसदेने हा निर्णय मागे घेण्यासाठी ऑगस्ट २०१८ मध्ये एक दुरुस्ती विधेयक मंजूर केले. या सुधारणेत म्हटले आहे की, 'फौजदारी खटला दाखल करण्यासाठी प्राथमिक चौकशीची गरज भासणार नाही आणि या कायद्यांतर्गत अटक कोणत्याही मंजुरीस पात्र ठरणार नाही'. शतकानुशतके अनुसूचित जाती आणि जमाती समाज सामाजिक कलंक, दारिद्रय आणि मानहानीचा सामना करीत आहेत, असे सांगत सरकारने हि सुधारणा केली आहे. अशा कृती जरी शिक्षेची तरतूद असली तरीही शिक्षेपेक्षाही अस्पृश्यता आहे ही दृष्टप्रथा नष्ट करणे हा प्रमुख उद्देश होता. पण अपेक्षेप्रमाणे सदर कायदा जातीय अत्याचाराला योग्य प्रमाणात नियंत्रणात अपुरा पडू लागला. म्हणून भारतीय संसदेने पुन्हा सुधारित कायद्याची तरतूद केलेली आहे. भारतीय समाजातील अनुसूचित जाती जमाती आणि इतर समाजातील सलोख्याचे संबंध निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातून सदर कायदा महत्त्वाचा आहे.

➤ **संदर्भग्रंथ सुची:**


❖ महंत महाबिर दास, (१९७६), 'अ नॅशनल पेनिटेन्स रिमूव्हल ऑफ अनटृचबीलीटी' प्रकाशन विभाग, माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली

❖ श्रीराम निकम, (१९९२) 'डेस्टिनी ऑफ अटॅच्युबल्स इन इंडिया दीप आणि दीप' पब्लिकेशन प्राइवेट लिमिटेड, नवी दिल्ली, पृष्ठ १–५७.

❖ सुखादेव थोरात, 'ऑपरेशन ॲन्ड डिनाईल दलित डिस्क्रिनेशन ऑफ १९९० सेंचुरी', आर्थिक आणि राजकीय साप्ताहिक ३७ (फेब्रुवारी २००२): ५७२–५७८.

❖ दीपंकर गुप्ता (२०००) ''इनट्रोगेटींगकास्ट: अंडरस्टॉन्डींग हॅरिची ऑन्ड डिफ्रन्सी इन इंडियन सोसायटी'', pogvalMnabau@sa (MiDyaa plvhITI-lal-poja 136-137-

❖ बेला भाटिया, (१९९७), ''अन्टॉमी ऑफ मस्साक्रो'' सेमिनार ४५०, (फेब्रुवारी १९९७): ५८––५८.

❖ ऑब्रोज पिंटो,१९९२ ''कास्ट कॉन्फलिक्ट इन कर्नाटका'', EPW २७ जुलै १९९२ १४६५–१४६६.

❖ राधिका रामशनन, (१९९५) ''दलित पॉलिटिक्स इन यु.पी.'', सेमिनार ४२५ (जानेवारी १९९५): ७

❖ गोपाळ गुरू, ''गोवारी ट्रॅजेडी: क्रायसीस ऑफ मराठा हेगेमनी'', EPW, ३० (फेब्रुवारी १९९५): ३०३ – ३०४.

❖ गोपाळ गुरू (१९९२) यांनी ''अंडरस्टॉन्डिग वायलेशन अगेन्सट दलितस इन मराठवाडा''

❖ भारतीय संविधान, १९४९ ते २०१९, सुधारित दुरुस्तीसह, भारतसरकार, नवी दिल्ली.

❖ भारत संविधानानुसार सरकार अधिनियमित १९५५ 'नागरी हक्क संरक्षण कायदा' राज्यपत्रानुसार अधिनियम १ जून १९५५

❖ भारत संविधानानुसार सरकार अधिनियमित १९८९ 'अनुसूचित जाती आणि जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा' राज्यपत्रानुसार अधिनियम दि. ३१ जानेवारी १९९० पासून अंमलबजावणी

❖ भारत सरकार जीएसआरक्र ३१६ (इ) ३१/३१९९५ नुसार राज्यपत्रानुसार अधिनियम दि. ३१ मार्च १९९५ पासून अंमलबजावणी

❖ भारत सरकार २०१६ अनुसूचित जाती आणि जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा (संशोधन नियमावली) भारताचे असाधारण राजपत्र क्रमांक २६८, दिनांक १४ एप्रिल २०१६ नुसार अधिसूचित.

❖ भारत सरकार २०१८ अनुसूचित जाती आणि जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा (संशोधन नियमावली) भारताचे असाधारण राजपत्र क्रमांक २७/२०१८, दिनांक १७ अगस्ट २०१८ नुसार अधिसूचित.




Scanned by CamScanner